सदरक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उप आयुक्त(अभियान),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५८१८
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :१३/०९/२०२३

# <u>प्रेस नोट</u>

बृहन्मुंबई शहरात अंमली पदार्थ विरोधी कायदयान्वये कार्यवाही करण्याकरीता पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. सत्य नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदीन विशेष मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मुंबई शहरातील सर्व पाचही प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, १३ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त तसेच सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार हे एकत्रित सर्व मुंबई शहरात कार्यवाही करीत आहेत.

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय माहितीच्या आधारे अंमली पदार्थांच्या वाहतूक, विक्री व व्यापार प्रतिबंध करुन अंमली पदार्थ मुक्त मोहिम राबविली आहे.

प्रस्तुत मोहिमेअंतर्गत मागील २४ तासात एनडीपीएस कायद्यान्वये खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| अभिलेखावरील तपासलेले आरोपी | अटक आरोपी | दाखल गुन्हे (एकुण ४) | | |
|---|---|---|---|---|
| | | गांजा | एमडी | एमडी + Cocaine |
| ३२८ | ७ | १ | २ | १ |

प्रस्तुत मोहिमेअंतर्गत दि. १२/०९/२०२३ रोजी मालवणी पोलीस ठाणे अंतर्गत एमडी व Cocaine हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून परदेशी नागरीकास अटक करण्यात आली आहे. तसेच धारावी, देवनार पोलीस ठाणे अंतर्गत एम.डी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची मोहिम यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. तसेच यापुढे देखील सदरची मोहिम राबविण्यात येत आहे.

-०-०-०-